09-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/8/2025 11:09 PM Page 1

कामगारांनी संघटित होऊन एकत्र येणे गरजेचे

ॲड. प्रसाद शहापूरकर | नागझरमध्ये कामगार कायद्याबाबत जनजागृती

■ टीम दैनिक हेराल्ड

नागझर : येथे कामगार दिनानिमित्त आयोजित शिबिरात बोलताना ॲड. मंदार जोशी.

पेडणे, दि. ८ : कामगार कायद्याबाबत जनजागृती होणे अपेक्षित आहे. कामगारांच्या समस्या वाढत जाणार आहेत. सद्यस्थितीत पेडणेतील मनोहर आंतरराष्ट्रीय मोपा विमानतळावरील खासगी आस्थापनातील गोव्यातील कामगारांची या ना त्या कारणाने सतावणूक केली जात आहे. त्यामुळे कामगारांनी संघटित होऊन एकत्र येणे आवश्यक आहे, असे ॲड. प्रसाद शहापूरकर यांनी सांगितले.

कामगार दिनाच्या निमित्ताने पेडणेतील कायदा सेवा समितीच्या वतीने नागझर येथील श्री वंस देव मंदिराच्या सभागृहात कामगारांच्या समस्यांबरोबरच कामगार कायद्याबाबत जनजागृती व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला कामगार आणि लोकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. यावेळी ॲड. शहापूरकर बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर ॲड. जितेंद्र गावकर, ॲड. मंदार जोशी, वारखंड नागझर पंचायतीचे उपसरपंच वसंत नाईक, स्थानिक पंचायत सदस्य देविदास च्यारी, निवृत्त अधिकारी भास्कर नारुलकर आणि श्री वंस देव देवस्थानचे अध्यक्ष वासुदेव तुळस्कर उपस्थित होते.

ॲड. शहापूरकर म्हणाले की, स्थानिक कामगारांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी मोपा विमानतळ परिसरातील पंचायतींचे सहकार्य महत्वाचे आहे. पंचायत आणि कायद्याचे रक्षण असलेले पेडणेतील वकील संघटनेतील सदस्य यांनी मिळून स्थानिक कामगारांच्या पाठीशी राहणे आवश्यक आहे.

ॲड. गावकर म्हणाले की, कामगार शिक्षित असून चालत नाही, त्याला कायद्याची प्राथमिक माहिती असावी लागते. कायद्याची साक्षरता लोकांच्या मनात निर्माण व्हावी. कामगारांसाठी कायद्याचे प्राथमिक ज्ञान ही भविष्याची तरतूद आहे. कामगारांनी न घाबरता आपल्या हक्कांसाठी एकत्रित पुढे येण्याचे गरज आहे. तसेच महिला कामगारांच्या संरक्षणासाठी विशाखा समित्या स्थापन करणे अपेक्षित आहे.

निवृत्त अधिकारी भास्कर नारुलकर म्हणाले की, फुकट मिळते त्याला महत्व नाही. असे न होता कामगारांनी या कायदा मार्गदर्शन शिबिराचा लाभ घेऊन सक्रिय होणे आवश्यक आहे. मोपा विमानतळावरील काही खासगी आस्थापनातील महिला कामगारांवर अनेक प्रकारे अन्याय होत असून छळवणूक केली जाते. त्यासाठी कामगारांना प्राथमिक ज्ञान प्राप्त व्हावे. या उद्देशातून हे शिबिर आयोजित केले आहे.

वारखंड नागझर ग्रामपंचायतीचे उपसरपंच वसंत नाईक यांनी पंचायतीकडून कामगारांना अपेक्षित सहकार्य करण्यात येणार आहे. तसेच पंचायतीकडून मनोहर आंतरराष्ट्रीय मोपा विमानतळावरील खासगी आस्थापनाकडे कामगारांच्या संरक्षणासाठी कागदोपत्री व्यवहार करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. मंदार जोशी यांनी केले.

पान १ वरून

लईराई जत्रोत्सवात देवस्थान समिती सजग

लईराई देवी जत्रेला गोवा सरकारने राज्यस्तरीय दर्जा जाहीर केला होता. मात्र, यासंदर्भात महाजनांची बैठक घेऊन निर्णय घेणे आवश्यक होते, असे समितीचे म्हणणे आहे. आम्ही महाजनांची बैठक घेऊन सरकारच्या घोषणेवर आक्षेप नोंदवला. शासनाच्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत, परंतु धार्मिक परंपरांमध्ये समन्वय आवश्यक आहे, असे गावकर यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत अग्नी दिव्य' या कार्यक्रमासंदर्भातही भूमिका स्पष्ट करण्यात आली. अग्नीदिव्य हा विधी वर्षातून एकदाच केला जातो, मात्र यावेळी जत्रोत्सवात विशेष कार्यक्रमात त्याचे आयोजन झाले, हे अयोग्य आहे, असा दावा समितीने केला.

देवस्थानचे माजी अध्यक्ष गणेश गावकर यांनी विद्यमान समितीवर विविध माध्यमांतून केलेले आरोप निराधार व दिशाहीन असल्याचे नूतन समितीने ठामपणे सांगितले. गेल्या वर्षभरात आम्ही सातत्याने कार्यरत होतो. आम्ही कोणतीही बाब गुप्त ठेवलेली नाही. उलट, माजी अध्यक्षांच्या कार्यकाळातील काही व्यवहारांवरही आम्ही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत, असा प्रतिवाद करण्यात आला.

शनिवारी घडलेली घटना अत्यंत वेदनादायी होती. यामध्ये निष्पाप लोकांचे प्राण गेले, काही आजही उपचार घेत आहेत. शासनाने या घटनेचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीने पत्रकार परिषदेत केली.

यावेळी देवस्थान समितीचे सदस्य भास्कर गावकर, आतिष गावकर, दयानंद गावकर, वासु गावकर, महादेव गावकर, प्रकाश गावकर, सुभाष गावकर, विश्वंभर गावकर, उपेंद्र गावकर, बाबूसो गावकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मडगाव बाजारपेठेतील ४५० हून अधिक दुकाने हाय अलर्टवर

परिस्थितीत मोठा गोंधळ निर्माण होण्याची व्यापाऱ्यांना भीती आहे. वाहतूक कोंडी व प्रवेशद्वारांचा अभाव यामुळे आग लागताच मोठी जीवितहानी होऊ शकते,असा इशारा व्यापाऱ्यांनी दिला.

अग्निसुरक्षा उपाययोजना अद्याप कागदावरच असून, नगरपरिषदेकडून ना स्पष्ट कृती आराखडा जाहीर करण्यात आला आहे ना कोणतीही अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना दिवसेंदिवस धोका पत्करून व्यवसाय करावा लागत आहे.

आगोंद पंचायतक्षेत्रात तीव्र पाणीटंचाई

ग्रामस्थांना मनस्ताप | आगोंद येथे फुटलेली जलवाहिनी केली दुरुस्त

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद : फुटलेली जलवाहिनी दुरुस्त करताना पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी.

आगोंद, दि. ८ : आगोंद पंचायतक्षेत्रात गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र पाणीटंचाई असून पाणी वितरण काणकोण विभाग सपशेल फेल ठरला आहे. परिणामी, नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, मंगळवारी मध्यरात्री वैले आगोंद येथील फुटलेली जलवाहिनी बुधवारी पाणी वितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी दुरुस्त केली.

दरदिवशी पाणी द्यायचे सोडाच दोन दिवसांमागून दोन तास सुद्धा या भागातील नागरिकांना पाणी मिळणे अशक्य झाले आहे. ही पाणी टंचाई एप्रिल महिन्यापासून आजपर्यंत सुरू असून बहुतेक समुद्र किनाऱ्यावरील शॅक्स, रेस्टॉरंट्स, रिसोर्ट आदी पर्यटक आस्थापने पर्यटन हंगाम संपल्यानंतर बंद करण्यात आले आहे. अशावेळी पिण्यायोग्य पाणी का मिळत नाही? असा प्रश्न संबंधित कर्मचाऱ्यांना केला असता काणकोण पाणी पुरवठा विभागाने आगोंद भागात पूर्वी सोडण्यात येत असलेल्या पाण्यातून पन्नास टक्के पाणी कमी केले आहे. त्यामुळे ही परिस्थिती उद्भवली असल्याचे सांगण्यात आले.

आगोंद भागातील लहान –मोठे ओहळ, विहिरी, तलाव दरवर्षीप्रमाणे यंदाही एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच सुकून गेल्यावर नळाच्या पिण्यायोग्य पाण्यावर या भागातील नागरिकांना अवलंबून रहावे लागत आहे. मात्र, या असंवेदनशील विभागाला याचे काही एक पडून गेलेले नाही. अशा प्रतिक्रिया या भागातून व्यक्त होत आहेत. आगोंद पंचायतक्षेत्रातील जलवाहिन्या पुन्हा पुन्हा फुटत असून त्यामुळे पाणी बऱ्याचप्रमाणात वाया जात असते. पाणी वितरण विभागाला जलवाहिनी फुटली असल्याची माहिती मिळेपर्यंत व ती दुरुस्त होईपर्यंत लाखो लीटर पाणी वाहून जात असते. सदर पाण्याचा प्रश्न स्थानिक आमदार तथा सभापती रमेश तवडकर माहीत असून मुडकूड येथील नदीवर बंधारा बांधण्याकरता सर्व कागदी सोपस्कार पूर्ण झालेले आहेत. या प्रकल्पाची निविदा सुद्धा एका ठेकेदाराला दिली गेली आहे. जोपर्यंत हा प्रकल्प पूर्ण होत नाही, तोपर्यंत ही समस्या कायम राहणार आहे, अशी माहिती सभापती तवडकर यांनी दिली आहे.

टँकर पोहचलाच नाही

काणकोण पाणीपुरवठा विभागाला वारंवार याप्रश्नी विचारणा करूनही काही एक फायदा झालेला नाही. दहा दिवसांपूर्वी मंगळवारी पाणी पुरवठा विभागाकडून वैले आगोंद या भागात आपण पाण्याचा टँकर पाठवून देतो, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, दहा दिवसानंतरही टँकर या भागात पोहचलेला नाही.

हरमल : वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देताना उमाकांत कोरकणकर. सोबत सरपंच अनुपमा मयेकर, दिलीप मेथर, अरुण बांधकर, प्रभाकर बानकर, अर्जुन गडेकर, सूर्यकांत कोरकणकर व इतर.

वेशभूषा स्पर्धेत जय कोरकणकर प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ८ : कोरकणवाडा येथील श्री राष्ट्रोळी ब्राह्मण देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित वेशभूषा स्पर्धेत जय सुभाष कोरकणकर(ययाति) प्रथम बक्षीस पटकावले. या स्पर्धेत १८ जणांनी भाग घेतला होता.

स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे बक्षीस रूद्र आदित्य मोंडकर (संभाजी) व तृतीय क्रमांकाचे बक्षीस आरोही रूपेश कोरकणकर(जिजाई) यांना देण्यात आले. या स्पर्धेचे परिक्षण ज्येष्ठ नाट्यकलाकार व लेखक सत्यवान पालयेकर व नाट्यकर्मी अर्जुन गडेकर यांनी केले. बक्षीस वितरण सोहळ्यास पुरस्कर्ते माजी जिल्हा पंचायत सदस्य अरुण बांधकर, सरपंच अनुपमा मयेकर, मुख्याध्यापक दिलीप मेथर, उमाकांत कोरकणकर, देवस्थानचे अध्यक्ष राजन बांधकर, उपाध्यक्ष राजन मांद्रेकर, प्रभाकर बांधकर, सचिव सूर्यकांत कोरकणकर, खजिनदार सुनील कोरकणकर, राजेश कोरकणकर, दत्ता कोरकणकर,योगेश कोरकणकर आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी संस्थेचे कौतुक केले व संस्कृती जतनासाठी मुलांना लक्ष्य ठेवले पाहिजे, असे आवाहन केले. प्रारंभी दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन केले.

संस्थेतर्फे रुचिता कोरकणकर, निकिता कोरकणकर व करिष्मा कोरकणकर यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन उपाध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी केले तर सुनील कोरकणकर यांनी आभार मानले. तद्नंतर श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कला निकेतन तर्फे सामाजिक 'शिक्षा तुझ्या कपाळी ' नाटक सादर करण्यात आले.

NOTICE

My Son **Late Digamber C. Naik** was owning **Hero Honda CBZ Motorcycle** bearing **Reg. No. GA-02-L-5662 & Honda Activa SCV110B Scooter** bearing **Reg. No. GA-06-J-1292.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 08.05.2025 Sd/-

Kanchan Chandrakant Naik
H. No. 7, Potxiro, Alto Bogmalo, Chicalim, Mormugao, South Goa 403806

Sandeep Ads

NOTICE

My Son **Late Gopal Naik** was owning **Piaggio Aprilia SR 125 Scooter** bearing **Reg. No. GA-06-AE-0229.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 08.05.2025 Sd/-

Kanchan Chandrakant Naik
H. No. 7, Potxiro, Alto Bogmalo, Chicalim, Mormugao, South Goa 403806

Sandeep Ads

TRANSFER OF VEHICLE

I **SMT. VALENTINA FERNANDES** wife of **LATE. HILARIO RODRIGUES R/o, H.NO. 624,KARAI, SHIRODA, PONDA-GOA** would like to transfer the **(Hero Honda Motorcycle with gear, Bearing Reg. No. GA-05-C-8694and Maruti Suzuki Wagon R VXI 1.2L,Bearing Reg. No. GA-05-F-1760)** on my name. Any person having any claim or objection in this regards shall intimate to the **RTO, PONDA** within 15 days from the date of publication of the notice.

SD/- **VALENTINA FERNANDES**

बीए.बी.एड, बीएससी.बी.एड ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि.८ : उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या विद्या प्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स, एज्युकेशन, कॉम्प्युटर ॲंड मॅनेजमेंट, विद्यानगर, आल्तो-पर्वरी, गोवा आणि हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे गणपत पार्सेकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, विद्या संकुल, भोम, पठार, हरमल या महाविद्यालयांच्या २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी बीए.बी.एड आणि बीएससी.बी.एड एकात्मिक कार्यक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत, असे आवाहन उच्च शिक्षण संचालनालयातर्फे करण्यात आलेले आहे. बीए.बीएडसाठी १५० जागा, तर बीएससी.बीएडसाठी ५० जागा असल्याची माहिती उच्च शिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आलेली आहे.

इथे साधू शकता संपर्क

इच्छुक उमेदवारांनी समर्थ ई-गव्हर्नन्स संकेतस्थळाद्वारे अर्ज करावा. अधिक माहितीसाठी https://www.dhe.goa.gov.in **या उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. संपूर्ण प्रक्रियेत अर्जदारांना मदत करण्यासाठी संकेत स्थळावर तपशीलवार अर्ज व मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध असतील.**

१६ मे अर्ज करण्याचा शेवटचा दिवस

ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया गुरुवारी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू झाली असून दि. १६ मे हा अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिवस आहे. गुणवत्ता यादी तयार करणे आणि समुपदेशन प्रक्रिया संबंधित महाविद्यालयांद्वारे आयोजित केली जाईल,असेही उच्च शिक्षण संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे.

शिरगाव घटनेतील मृतांना श्रद्धांजली

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ८ : मांद्रे विकास परिषदेतर्फे गोव्यातील प्रसिद्ध श्री लईराई जत्रोत्सवात घडलेल्या घटनेत मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मांद्रे कॉलेजच्या सभागृहात घेण्यात आलेल्या वार्षिक सभेत एक मिनिट स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. गोव्यात कित्येक भागात मोठ्या जत्रा भरतात. येथे प्रशासन, देवस्थान समिती व भक्तजन एकत्रित येऊन सुरक्षेचे उपाय करणे आवश्यक असते. मांद्रे परिसरात होणाऱ्या मोठ्या उत्सवासाठी अशा सुरक्षा उपाययोजनेसाठी मांद्रे विकास परिषद संस्था नेहमी तत्पर राहील,असे संस्थेचे चेअरमन रमाकांत खलप यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे सदस्य ॲड. अमित सावंत यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला व मृत व्यक्तींच्या कुटुंबांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अंजुणे मोर्ले कॉलनी येथे संत समागम उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ८ : परम पूजनीय सद्गुरू माऊलीच्या कृपाशीर्वादाने संतसमाज मोर्ले कॉलनीच्या नवीन रचनेनुसार अंजुणे मोर्ले कॉलनी येथील यजमान व खजिनदार सौ.व श्री.सतीश सहदेव गावस यांच्या निवासस्थानी नवीन संत समागम संपन्न झाले.

सद्गुरू नामघोषाने व दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मोर्ले देऊळवाडा या गावातील देवस्थान समितीचे अध्यक्ष विठोबा गावकर, संतसमाज अध्यक्ष पांडुरंग गावस, धर्म प्रचारिका सुचिता गोसावी व संत समाजाचे ज्येष्ठ गुरुबंधू विष्णू तानोडी उपस्थित होते.

आजच्या काळात तसेच नवीन पिढीकरिता अशा या संत समागमाची गरज आहे. आज आपल्या मुलांना सुसंस्कारांची गरज आहे. आज ती संस्कृती पद्मनाभ पीठ व स्वामीजी करत आहेत. आज लहान वयातच प्रत्येकाने सद्गुरू सेवा केली पाहिजे, असे विठोबा गावकर यांनी सांगितले.

यावेळी सद्गुरू पूजन, उद्घाटन सोहळा संपन्न झाला. धर्म प्रचारिका सुचिता गोसावी, उद्गाता सिमरन तानोडी, पुरोहित रामचंद्र नाईक यांनी आपले विचार व्यक्त केले. पांडुरंग गावस यांनी आभार मानले. सुधाकर गावस व सेजीता गावस यांनी गजर घेतला. स्वागत व प्रास्ताविक सीता रामचंद्र नाईक यांनी केले. उपाध्यक्ष कृष्णा गावस यांनी आभार मानले.

मोर्ले : अंजुणे मोर्ले कॉलनी येथे संत समागम कार्यक्रमात प्रार्थना करताना सांप्रदायिक.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India A Government of India Undertaking

फर्मागुडी गोवा शाखा

सोने लिलाव नोटीस

खाली दिलेल्या व्यक्तींना याद्वारे कळविण्यात येते की, कर्ज खात्यातील दायित्वांची परतफेड करण्यात त्यांना अपयश आले आहे. त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठवलेल्या नोटीसा कार्यवाही न होता बँकेकडे परत आल्या आहेत. त्यामुळे त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दायित्वे व इतर शुल्कांची परतफेड करावी व तारण ठेवलेल्या सुरक्षा चीजवस्तू **15-05-2025** रोजी वा त्यापूर्वी परत न्याव्यात. अन्यथा बँकेच्या आवारात **15-05-2025** रोजी दुपारी **4.00** वाजता किंवा त्यानंतर कोणत्याही सोईच्या दिवशी अधिक सूचना न देता, जे बँकेच्या संपूर्ण अधीन असेल, कर्जदाराच्या खर्चाने जाहीर लिलावाने बँकेद्वारे सदर सुरक्षांची विक्री केली जातील.

कर्जदाराचे नाव व पत्ता : श्री. पुंडलिक नवनाथ नाईक, नवनाथ नाईक यांचा मुलगा, राहणार घर क्र. **04**, तळुले गाव, पो.ऑ. बांदोडा, तालुका फोंडा, उत्तर गोवा **403401**.

कर्जाची तारीख	कर्ज खाते क्रमांक
15-05-2024	132826540000130
16-05-2024	132826540000134
24-07-2024	132826540000145

दिनांक : 09-05-2025 **शाखा व्यवस्थापक**

टीप : देय रकमेत सदर कर्जदाराच्या सोने तारण कर्जाखालील तसेच कोणत्याही अन्य कर्ज क्रेडिट सुविधांचा समावेश आहे.

बाल घुमट आरती स्पर्धेत ओम् कलासृष्टी मंडळ प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे दि. ८ : येथील मदनंत क्रिकेट क्लबतर्फे क्लबच्या वर्धापनदिनी आयोजित आमंत्रित बाल घुमट आरती स्पर्धा क्लबच्या सभागृहाच्या आवारात संपन्न झाली. या स्पर्धेत बांदोडा येथील ओम् कलासृष्टी आरती मंडळास प्रथम बक्षीस प्राप्त झाले.

या स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे : द्वितीय – स्वर सातेरी बाल आरती मंडळ, सावईवेरे, तृतीय – मोरेश्वर सख्याहरी मंडळ, सावईवेरे , उत्तेजनार्थ – मदनंत आरती मंडळ, सावईवेरे, श्री मल्लिकार्जुन आरती मंडळ, खांडोळा , बाल आरती मंडळ, शिलवाडा यांना बक्षिसे मिळाली. स्पर्धेचे परीक्षण संदेश नाईक व दामोदर नाईक यांनी केले.

बक्षीस वितरण सोहळा शेखर पालकर, सत्यवान शिलकर, अक्षय नाईक, संदेश नाईक व दामोदर नाईक यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सूत्रनिवेदन व आभारप्रदर्शन हेमंत कासार यांनी केले.

सावईवेरे : प्रथम क्रमांक प्राप्त ओम् कलासृष्टी मंडळातील बाल कलाकारांसोबत शेखर पालकर, सत्यवान शिलकर , अक्षय नाईक, संदेश नाईक व दामोदर नाईक